नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/01/2024 (मंगळवार) सकाळ

## कळमेश्वर येथील सट्टापट्टीवर
## —: विशेष पथक नागपुर ग्रामीणची कारवाई :—

मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे आदेशान्वये नागपुर ग्रामीण हद्दीत अवैध धंदयावर कार्यवाही करणेकामी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथक नागपूर ग्रामीण हे पो.स्टे. कळमेश्वर येथील स्टाफसह पोस्टे कळमेश्वर परीसरात पेट्रोलींग करीत असतांना विश्वसनीय मुखबीर द्वारे खबर मिळाली की, मौजा चिचभवन १४ मैल फाटा चौकामध्ये देशी दारूच्या दुकानाचे बाजुला डवले नावाचा इसम हा लोकांकडून पैसे घेवुन आकडे कागदावर लिहुन सट्टापट्टी मटका जुगार खेळवित आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून यातील पोलीस स्टॉफ सह मिळालेल्या खबरेच्या ठिकाणी देशी दारूच्या दुकानाचे बाजुला जावुन सापळा रचुन दारूच्या दुकानाचे बाजुला दि. ०८/०१/२०२४ चे १६.२० वा. दरम्यान देशी दारूच्या बाजूला लोक येतांना दिसले तेव्हा सट्टापट्टी बाबत खात्रीशीर खबरेनुसार नमुद घटनास्थळी आकडयाची सट्टापट्टी लावुन हारजितचा जुगार खेळत असल्याचे दिसुन आल्याने नमुद घटनास्थळी **आरोपी नामे— १) दिलीप रामरावजी डवले, वय ६० वर्ष, रा. वार्ड नं. ०३, नागपुर जि. नागपुर, २) संजय चिंदुजी सरोदे वय ३८ वर्ष, रा. धामना ता. जि. नागपुर** असे सदर इसम आकडयाची सट्टापट्टी लावुन हारजितचा जुगार खेळतांना व लोकांकडुन पैसे स्वीकारताना मिळुन आल्याने आरोपीतांकडुन नगदी १०४७८/— रू व आरोपी क्र. १) याचे आयटेन कंपनीचा निळया रंगाचा साधा मोबाईल किंमती २,०००/— रू व आरोपी क्र. २) याचे विवो कंपनीचा फिकट गुलाबी रंगाचा अॅन्डाईड मोबाईल अंदाजे किंमती १०,०००/—रू. तसेच २ निळया शाईचे पेन किंमती १०/— रू. असा एकुण २२,४८८/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम १२(अ) मजूका सहकलम १०९, ३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचेरकर, पोलीस अंमलदार अतुल बांते मा. पोलीस अधिक्षक सा. विशेष पथक नागपूर ग्रामीण, पोस्टे कळमेश्वर येथील पोलीस हवालदार किशोर लोही, शेंडे यांचे पथकाने केली.

## कळमेश्वर येथील सट्टापट्टीवर
## —: विशेष पथक नागपुर ग्रामीणची कारवाई

मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे आदेशान्वये नागपुर ग्रामीण हद्दीत अवैध धंदयावर कार्यवाही करणेकामी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथक नागपूर ग्रामीण हे पो.स्टे. कळमेश्वर येथील स्टाफसह पोस्टे कळमेश्वर परीसरात पेट्रोलींग करीत असतांना विश्वसनीय मुखबीर द्वारे खबर मिळाली की, मौजा कळमेश्वर MIDC परीसरात पानठेल्याचे बाजुला हेमराज खापरे नावाचा इसम हा लोकांकडून पैसे घेवुन आकडे कागदावर लिहुन सट्टापट्टी मटका जुगार खेळवित आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून यातील पोलीस स्टॉफसह मिळालेल्या खबरेच्या ठिकाणी MIDC ऑफीस समोरील पानठेल्याजवळ जावुन सापळा रचुन दि. ०८/०१/२०२४ चे १८.१५ वा. दरम्यान MIDC आफीस समोरील पानठेल्याजवळ लोकांची गर्दी दिसली. तेव्हा सट्टापट्टी बाबत खात्रीशीर खबरेनुसार नमुद घटनास्थळी आकडयाची सट्टापट्टी लावुन हारजितचा जुगार खेळत असल्याचे दिसुन आल्याने नमुद घटनास्थळी **आरोपी नामे— हेमराज भाउराव खापरे, वय ५१ वर्ष, रा. वार्ड नं.२, कळंबी ता. नागपुर जि. नागपुर** सदर इसम आकडयाची सट्टापट्टी लावुन हारजितचा जुगार खेळतांना व लोकांकडुन पैसे स्वीकारताना मिळुन आल्याने आरोपीकडुन नगदी ३८४१/— रू व आरोपी याचे सॅमसंग कंपनीचा काळया रंगाचा साधा मोबाईल किंमती २,०००/— रू व तसेच २ निळया शाईचे पेन किं. १०/— रू. असा एकुण ५,८५१/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर आरोपीस विचारपुस दरम्यान सदरची सट्टापट्टी ही दिनेश ठाकुर वय अंदाजे ४० वर्ष, रा. कळमेश्वर याचे सांगणेवरून सट्टापट्टीचे आकडे लिहत असल्याचे सांगितले. आरोपीतांविरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम १२(अ) मजूका सहकलम १०९, ३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचेरकर, पोलीस अंमलदार अतुल बांते मा. पोलीस अधिक्षक सा. विशेष पथक नागपूर ग्रामीण यांचे पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर